सृष्टिमित्र पारितोषिक स्पर्धा-२०१४-१५
आयोजित करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## पर्यावरण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः इएनव्ही-२०१४/प्र.क्र.३०/तांक-३**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय , मुंबई - ३२

दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१५

**प्रस्तावना -**

पर्यावरणविषयक बाबींची जाणीव जनमानसांत निर्माण करुन पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनार्थ विस्तृत प्रमाणात जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षापासून म्हणजे २०१० पासून "सृष्टिमित्र पारितोषिक" ही योजना राबविण्यात येत आहे. तद्नुषंगाने सन २०१४-१५ या वर्षात राज्यस्तरीय सृष्टिमित्र पारितोषिकांसाठी स्पर्धेचे आयोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती विद्यार्थी, महिला तसेच नागरीकांमध्ये करण्यासाठी "सृष्टिमित्र पारितोषिक" या योजनेंतर्गत राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. स्पर्धा विविध गटांसाठी आयोजित करण्यात येत असून त्यात शालेय व महाविद्यालय प्रकल्प, छायाचित्र, घोषवाक्य, बालसाहित्य, स्लाईड शो, सर्वोत्तम इको-क्लब, पर्यावरण संवर्धनात महिलांचा सहभाग, शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षणातील यशस्वी प्रकल्प असे संवर्ग असणार आहे. सृष्टिमित्र पारितोषिक स्पर्धेचे आयोजन व समन्वयन, मागील तीन वर्षापासून समन्वयन करीत असलेली संस्था-केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत "सेंटर ऑफ एक्सलन्स" म्हणून नियुक्त केलेले "पर्यावरण शिक्षण केंद्र" पुणे (Centre for Environment Education (CEE),) यांचेमार्फत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. CEE पुणे यांनी उपरोक्त कार्यक्रमांतर्गत राबवावयाचे उपक्रम व खर्चाच्या बाबी पुढील प्रमाणे :.

| Sr.No.. | Description | Proposed Amount |
|---|---|---|
| 1 | Publicity (Print ) material creation<br>- two ADs in English and Marathi<br>- one AD for the website<br>- one slide show on SMA | 8,00,000 |
| 2 | Publicity at district level in ESS and WGSEC of Environment Dept<br>-event for media, NGOs, schools to share information with local schools, media and photographer/authors clubs and banners on public places | |

| Sr.No.. | Description | Proposed Amount |
|---|---|---|
| 3 | Advertisement in women and popular magazine<br>-Especially focused on women Contributors category | |
| 4 | Standee for distribution to schools & Colleges | |
| 5 | Leaflet insertion<br>-Design and production of the leaflets<br>-commissioning of publicity agency to do the insertions in newspapers<br>8 Districts (Pune, Thane, Nashik, Nagpur, Aurangabad, Amaravati, Chandrapur, Wardha) | |
| 6 | Communication kit for schools and colleges<br>-including a posters and brochure, letters, envelop-5000 copies (in English & Marathi) | 2,00,000 |
| 7 | Website development<br>-salary or website development charges<br>-software, security audits etc | 2,00,000 |
| 8 | Broadcasting of the event at DD Sahyadri<br>-Request for proposal for coverage of Award event and broadcasting of the same through DD channel.<br>-DD to telecast Award event through their Channel | 3,95,000 |
| 9 | Initial meeting with the evaluation committee at Pune | 70,000 |
| | Coordination meeting and core travel cost | |
| | Panel Exhibition support System (at Pune) | |
| 10 | Project Staff based on experience up to Rs.22,000*12months | 2,64,000 |
| 11 | Evaluation of Entries | 1,40,000 |
| 12 | Coordination of the project<br>-content development and designing of the materials<br>-documentation and report writing<br>-Synergy meetings with other depths & agencies<br>-Social media<br>-Coordination of the activities and with the project staff, supports and other agencies and supervision of progress<br>-Logistic costs | 3,00,000 |
| 13 | Internship Programme & Positioning of the Award | 50,000 |
| 14 | Prize Money | 2,48,000 |
| 15 | Certificate design and printing | 10,000 |
| 16 | Book/Souvenir produced from the winning entries<br>-design and printing (4 Colour *500 Copies) | 1,50,000 |
| 17 | Award Presentation Event<br>-venue, food, guest accommodation<br>-resource person, local travel, banners<br>-press/media kit<br>-Banners<br>-Photo and video documentation<br>CD/DVD coping & distribution | 2,50,000 |

| Sr.No.. | Description | Proposed Amount |
|---|---|---|
| 18 | Travel, accommodation and food etc. for winners of 23 sub-categories<br>-3to 4 winners per sub-category total around 80 participants<br>-Rs.5000*80 | 4,00,000 |
| 19 | Exhibition of best 60 entries (projects/Photos)<br>-design and printing @approx. Rs1200 | 60,000 |
| 20 | Communications, photocopy, draft prints, stationary and local travel | 70,000 |
| 21 | postage and dissemination of Communication kit and Souvenir, CDs | |
| | **Total** | **36,07,000** |
| | 10% Administration Charges | 3,60,700 |
| | **Grand Total** | **39,67,700** |

३. सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांना उपरोक्त कार्यक्रम राबविण्यासाठी उपरोक्त प्रमाणे एकूण रु. ३९,६७,७००/- (एकूण रूपये एकोणचाळीस लाख सदुसष्ट हजार सातशे फक्त) एवढया खर्चास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. खर्चाचा तपशिल व त्यातील बदल, याबाबतचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

४. स्पर्धेचे आयोजन व आयोजनाबाबत सर्व निर्णय पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे हे पर्यावरण विभागाच्या पूर्व संमतीने घेतील. स्पर्धेच्या आयोजनासाठी पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे यांना उपरोक्त रु.३९,६७,७००/- एवढया मंजूर रक्कमेपैकी खर्चासाठी पहिला हप्ता म्हणून रु. २४.५० लक्ष (अक्षरी रुपये चोवीस लक्ष पन्नास हजार फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त रक्कमेचा धनादेश "Centre for Environment Education", Pune यांच्या नावे काढण्यात यावा. या व्यतिरिक्त मार्च,२०१४ अखेर शिल्लक रू. ४,०७,५५३/- एवढी रक्कम उक्त नमुद खर्चाच्या बाबींसाठी वापरण्यात यावी.

५. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. यू-४-३४३५-परिस्थितीकी पर्यावरण, ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनातर्गत योजना (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृति योजना (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली २०१५-१६ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षी उपरोक्त लेखाशिर्षाखाली एकूण रु. ३५.०० लक्ष अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

६. उपरोक्त रक्कम रु. २४.५० लक्ष (अक्षरी रुपये चोवीस लक्ष पन्नास हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून "Centre for Environment Education", Pune यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. वि.गो. कडू, कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, मंत्रालय व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.सो.ना.बागुल, उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय

यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी Centre for Environment Education, Pune यांना रु. २४.५० लक्ष (अक्षरी रुपये चोवीस लक्ष पन्नास हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

७. सदर शासन निर्णय नियोजन विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र. ३४६/१४७२/व्यय-१६, दिनांक २९/७/१५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५ /प्र.क्र.८५/अर्थ- ३ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील परि. क्र.७ (क) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रातील अटींची पूर्तता होत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१०१७१२१८२६९८०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सो.ना.बागुल)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
४. मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, सेंट्रल रिजन सेल, पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा) महा-१ व महा-२, मुंबई / नागपूर
८. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०. वित्त विभाग (अर्थ-७/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२. पर्यावरण विभागातील सर्व कायासने
१३. निवड नस्ती